# लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ अंतर्गत "सक्षम लोकशाहीकरीता सर्वांचे मतदान" मोहिम

**"सक्षम लोकशाहीकरीता सर्वांचे मतदान"** या मोहिमे अंतर्गत सर्व घटकांचे अधिकाधिक मतदान होणेकरीता प्रोत्साहीत करणे, आवश्यक त्या उपाययोजना करणे, मतदानाची टक्केवारी जास्तीत जास्त वाढिवण्याकरीता प्रयत्न करणे, वयोगट 18 ते 20 या वयोगटातील नवमतदारांना मतदान करण्याकरीता जनजागृती करणे, विशेषत: दिव्यांग, तृतीयपंथी, वय वर्ष 85 पेक्षा अधिक असलेल्या मतदारांना मतदान करणेकरीता प्रोत्साहीत करणे तसेच निवडणूक आयोगानुसार दिलेल्या निर्देशांनुसार कामकाज करणे, मतदान केंद्रांवर मतदारांना आवश्यकतेनुसार सोईसुविधा उपलब्ध करुन देणे आणि येत्या 26 एप्रिल, 2024 रोजी होऊ घातलेल्या मतदानाच्या दिवशी मतदानाकरीता प्रोत्साहीत करणे व आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांना विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत.




## विभागीय आयुक्तांचा दिव्यांग व तृतीयपंथी मतदारांसोबत 'चला जाऊया मतदानाला'चा संदेश






**बुलढाणा, १८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** विभागीय आयुक्तांचा दिव्यांग व तृतीयपंथी मतदारांसोबत चला जाऊया मतदानालाचा संदेश सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग अर्थात स्वीप या कार्यक्रमांतर्गत गुरुवारी समाज कल्याण विभागाच्या वतीने तृतीयपंथी मतदार व दिव्यांग मतदार यांच्या मतदार जाणीव जागृती विषय आयोजित कार्यक्रमात अमरावती विभागाच्या आयुक्त डॉ. निधी पांडे यांनी तृतीयपंथी व दिव्यांगांशी संवाद साधून त्यांना मतदान विषयक आवाहन केले. तसेच त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. काही दिव्यांग बंधू-भगिनी आपल्या समवेत खुर्चीवर बसू शकत नाहीत व उभेही राहु शकत नाही ही बाब लक्षात घेऊन डॉ. निधी पांडे यांनी स्वतः त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायऱ्यांवर बसून' चला जाऊया मतदानाला''हा संदेश दिला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन तसेच इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्तांनी सर्वांशी त्यांनी संवाद साधला आहे.




**प.पू. शुकदास महाराज समाधी सोहळयात**
**दिव्यांग मतदान जनजागृती कार्यक्रम जिल्हा – बुलढाणा**

# पॉलि-क्लिक मानवी साखळीतून मतदान जनजागृती




बुलढाणा : सु. ब. मोहता विद्यालय वडनेर भोलजी येथील विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करुन मतदान जनजागृती केली या विद्यार्थ्यांनी ' गो फॉर वोट ' अशी साखळी केली